# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 14/07/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

## चोरी

**१) पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील पांढुर्णा रोडनी मधुमालती लॉन सावनेर येथे दिनांक १२/०७/२०२३ चे २२.३० ते २२.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— नितीन तुकाराम दडमल, वय २५ वर्ष, रा. पांढुर्णा रोड गुरारीकर ले आउट वार्ड नं. ९ सावनेर हे व त्याचे मित्र नामे—पवन छत्रपती निखारे, वय २६ वर्ष हे नमुद घटना वेळी व ठिकाणी रात्रीला जेवण झाल्यावर फिरायला गेले असता मधुमालती लॉनचे जवळ ले आउटचे ओटयावर मोबाईल ठेवुन गोष्टी करीत असतांना २ अनोळखी इसम रस्ता विचारण्या करीता जवळ आले. फिर्यादी व फिर्यादीच्या मित्राची नजर चुकवुन अंधाराचा फायदा घेवुन ओटयावर ठेवलेला टेक्नो कंपनीचा मोबाईल किंमती अंदाजे ५०००/— रू. व रियलमी कंपनीचा आय ५ एन्ड्राईड मोबाईल किंमती अंदाजे १००००/—रू. असा एकुण १५,०००/—रूपयाचा २ मोबाईल अनोळखी इसमांनी चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक रविन्द्र चटप मो. नं. ८३२९७२७६११ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. एम. आय. डी. सी. बुट्टीबोरी** :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील भारकस येथे दिनांक १२/०७/२०२३ चे ११.०० वा. ते १३.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— रामबली चंद्रदेव गुप्ता, वय ३४ वर्ष, रा. भारकस सिक्युरीटी गार्ड पेट्रोल कंपनी मध्ये सिक्युरीटी गार्ड म्हणुन काम करतो. दिनांक १२/०७/२०२३ चे ११.०० वा. ते ०१.०० वा. दरम्यान कंपनी परीसरात फिरत असतांना कंपनी स्टोअर मध्ये जुनी मोटार बाडी ०२ नग, मोटार पार्ट (गेअर बॉक्स) ०३ नग, मोटरचे बेअरींग ०३ नग किंमती अंदाजे ५००००/— रूपयाचा जुना भंगार मुद्देमाल कोणीतरी चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एम. आय. डी. सी बुट्टीबोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार दीप पांडे मो. नं. ८८८८३८९९५ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत धंतोली काटोल येथे दिनांक १२/०७/२०२३ चे १७.०० वा. ते दिनांक १३/०७/२०२३ चे १८/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— प्रणाली रामकृष्ण कळंबे, वय २५ वर्ष रा. जलालखेडा वार्ड नं. ४ त. नरखेड ह. मु. संजय रेवतकर यांचेकडे किरायाने धंतोली काटोल ता. काटोल हिने स्वत:चे काम आटोपुन नेहमी बाहेर जाण्याकरीता वापरत असलेली स्वत:ची गुलाबी रंगाची लेडीज सायकल हि दि. २३/०६/२०२३ रोजी दुपारी ०४:०० वा. सुमारास किरायाने राहत असलेल्या घराचे बाजुला सायकल आणुन उभी केली त्यानंतर सायकल ही पंचर असल्याने फिर्यादिने सायकल वापरली नाही व सायकलकडे लक्ष दिले नाही. दि. १२/०७/२०२३ चे सायंकाळी ०५.०० वा. सुमारास फिर्यादी रूमचे खाली फिरत असता तेथे सायकल होती दि. १३/०७/२०२३ रोजी सायंकाळी ०६.०० वा. फिर्यादीस कामानिमीत्य बाहेर जायचे असल्याने सायकलकडे लक्ष दिले असता सायकल दिसली नाही म्हणुन फिर्यादिने घराचे आजुबाजुला शोध घेवुन विचारपुस केली असता फिर्यादिची सायकल मिळुन न आल्याने फिर्यादिची गुलाबी रंगाची लेडीज सायकल किंमती अंदाजे २,०००/— रू. ची कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रभुदास दलाल ब. नं. १६२५ मो. नं ९५६१५६४८५२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**